# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## ।। प्रकटन ।।

विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) फेब्रुवारी – मार्च २०२४ परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास मुदतवाढ देणे व चलन Download करुन बँकेत शुल्क भरण्याच्या तारखाबाबत.

संदर्भ :– क्र. रा.मं/परीक्षा–३/४३९४, दिनांक ०६/१०/२०२३ रोजीचे प्रकटन.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षा फेब्रु–मार्च २०२४ परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या नियमित विद्यार्थी, व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer Of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेऊन प्रविष्ठ होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर प्रचलित पध्दतीने भरण्याची मुदत दिनांक ०६/११/२०२३ रोजी समाप्त होत असून नियमित शुल्कासह मुदतवाढीच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे –

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत शास्त्र, कला, व वाणिज्य शाखांचे नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL DATABASE वरुन ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याच्या तारखा तसेच व्यवसाय अभ्यासक्रम (HSC Vocational Stream) शाखांचे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer Of Credit घेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखा. |
|---|---|
| नियमित शुल्क | मंगळवार, दिनांक ०७ नोव्हेंबर २०२३<br>ते<br>सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२३ |

संदर्भांकित प्रकटनात बँकेत शुल्क भरण्याच्या तारखा नंतर कळविण्यात येतील असे कळविले होते. त्यानुसार नियमित व एम.सी.व्ही.सी. चे विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी. तुरळक विषय, आय.टी.आय. चे विषय घेणारे विद्यार्थी, श्रेणीसुधार व खाजगी, इत्यादी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केल्यानंतर बँकेत शुल्क भरण्याच्या तारखा खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत –

| | |
|---|---|
| उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन शुल्क भरण्याच्या तारखा | गुरुवार, दिनांक ०९ नोव्हेंबर २०२३<br>ते<br>शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२३ |

अ) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क RTGS/NEFT द्वारे भरावयाचे आहे.

ब) सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमिट केल्यानंतर आवेदनपत्रे भरण्याच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळणी करुन अचूक असल्याची खात्री

करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

खालील तपशीलाप्रमाणे विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क खाली नमूद केलेल्या बँकेमध्ये RTGS द्वारे भरावयाचे आहे –

१. पुणे, औरंगाबाद व कोल्हापूर :– **Bank of India Virtual Account**

२. मुंबई, नागपूर व लातूर :– **HDFC Bank Virtual Account**

३. अमरावती, नाशिक व कोकण :– **AXIS Bank Virtual Account**

१. आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकिय चलन Download करुन चलनावरील Virtual Account मध्ये NEFT/RTGS द्वारे भरावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी NEFT/RTGS द्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच Account Number व IFSC Code चूकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

२. कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेली सर्व आवेदनपत्रांचे विहित परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांची प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ४.

दिनांक – ०२/११/२०२३

D:\Pardeshi\Application2024\HSC.docx13